जा.क्र. डॉबासाकोकृवि/विद्यापीठ ग्रंथालय/३२/२०२३
दिनांक—:०२/०५/२०२३

प्रति,

विषय—: विद्यापीठ ग्रंथालयातील निर्लेखित केलेल्या पुस्तकांच्या रद्दी खरेदीसाठी दरपत्रके पाठविणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाकडे खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ ग्रंथालयातील निर्लेखित केलेल्या पुस्तकांची रद्दी विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्या करिता आपाणांस विनंती करणेत येते की, आपण आपले रद्दी खरेदीसाठीचे दरपत्रके सीलबंद लखोटयात **मा. शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नांवे दिनांक १६/०५/२०२३ पर्यत पोहोचतील अशा रितीने पाठविणेत यावीत. लखोटयावर विद्यापीठ ग्रंथालयातील रद्दी खरेदी साठीचे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा.**

| अ.क्र. | रद्दीचा प्रकार | दर प्रती किं.ग्रॅम/मे.टन |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ ग्रंथालयातील निर्लेखित केलेल्या पुस्तकांची रद्दी | |

वर नमुद केल्याप्रमाणे आपण आपले सर्वात **जास्तीत जास्त दर नमुद करून दरपत्रक विहीत मुदतीत या कार्यालयाकडे पाठविणेत यावे.**

**अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील—:**

१. रद्दी खरेदीसाठी सर्वात जास्त नमुद केलेले दरपत्रक स्विकारणेत येईल.
२. रद्दी स्विकारल्यानंतर त्यांची इतरत्र विक्री न करता ती कागद कारखान्यांना अथवा अन्य उपयोगासाठी नाश करण्याचे रू. १००/—चे हमीपत्रावर लिहून द्यावे लागेल. सदर हमीपत्र रद्दी खरेदीकरतेवेळी देणे आवश्यक आहे.
३. रद्दी घेणेकरीता सरकारी प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
४. रद्दी या कार्यालयामध्ये जेथे असेल व जशी असेल या तत्तावर स्वत:चे कामगारामार्फत जमा करून घेणेची आहे.
५. या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासमोर वजन करून रद्दी ताब्यात घेणेची आहे. त्याकरिता लागणारी वैध वजने, काटे तसेच,बारदाने व बांधणेसाठी लागणारी सुतळ/दोरी आपण आणावयाची आहे.
६. वजन झाल्यानंतर दरपत्रकानुसार होणारी रक्कम त्वरीत धनाकर्षाद्वारे अथवा रोखीने विद्यापीठ फंडात जमा करून त्यांची पावती दाखविल्यानंतर रद्दी ताब्यात देण्यात येईल.
७. दरपत्रक स्वीकारणेत आल्यानंतर त्वरीत रद्दी खरेदी करावयाची आहे.
८. रद्दी खरेदीसाठी नमुद केलेले दर निम्नस्वाक्षरीकार यांना कमी वाटल्यास दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेबाबतचा अधिकार राखून ठेवणेत आला आहे.
९. दरपत्रकावर जीएसटी क्रमांक नमुद करावा. जीएसटी लागू होत नसल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे.
१०. एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.

आपली विश्वासू,

प्रभारी अधिकारी
विद्यापीठ ग्रंथालय,
डॉ.बा.सा.को.कृ.वि.,दापोली

**पत्रव्यवहाराचा पत्ता—:**
**प्रभारी अधिकारी,**
**विद्यापीठ ग्रंथालय,**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि**
**विद्यापीठ, दापोली जिल्हा— रत्नागिरी**
**पिन कोड—४१५७१२**

**Copy to -:** Officer In-Charge,AKMU, Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli for uploading on university website.